# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 01/01/2022 (शनिवार)
(सायंकाळ)

---

### गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 8 कि. मी. अंतरावरील मौजा आमगाव शिवार येथे दिनांक 31/12/2021 चे 07. 00 वा. सुमारास मोहन शामराव बुरडे(मृतक), वय 28 वर्ष, रा. आमगाव, ता. पारशिवनी याने चिंधुजी दुपारे यांचे शेतातील कडु निंबाच्या झाडाच्या फांदीला नायलॉन दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ज्ञानेश्वर डोमाजी राउत, वय 40 वर्ष, रा. पेंढरी, ता. पारशिवनी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पारशिवनी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास नापोशि रवी बर्वे मो.नं. 8830565076 हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत धोतीवाडा ता काटोल जि नागपुर येथे दिनांक 12/12/2021 चे 17.30 वा. दरम्यान समीर उत्तमराव उईके(मृतक), वय 24 वर्ष रा धोतीवाडा ता काटोल जि नागपुर याने आपले राहते घरी बाथरूम मध्ये कुठल्यातरी अज्ञात कारणावरून पिकावर फवारणी मारण्याचे विषारी औषध प्राषण केली. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचारकामी प्राथमिक आरोगय केंद्र कोंढाळी येथे अपघात विभाग आणुन दाखविले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. संबधीत कागदपत्रे पो.स्टे. कोंढाळी ला प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– उत्तम दामाजी उईके वय 52 वर्ष रा. धोतीवाडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार बाबुलाल राठोड मो क्र 7798344919 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर